**प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली**

# हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रत्नागिरी जिल्हा)

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ३/२०१९** | **दिनांक ०८/०१/२०१९** | **कालावधी ५ दिवस**


**डॉ. सुभाष चव्हाण,**
विभाग प्रमुख,
कृषिविदया विभाग
९४२२४३१०६७

**डॉ. विजय मोरे,**
नोडल ऑफिसर,
कृषिविदया विभाग
९४२२३७४००१

**डॉ. शितल यादव,**
तांत्रिक अधिकारी
कृषिविदया विभाग
८३७९९०११६०


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक ०२/०१/२०१९ ते ०८/०१/२०१९) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक ०९/०१/२०१९ सकाळी ८:३० पासून १३/०१/२०१९ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०२/०१ | ०३/०१ | ०४/०१ | ०५/०१ | ०६/०१ | ०७/०१ | ०८/०१ | | ०९/०१ | १०/०१ | ११/०१ | १२/०१ | १३/०१ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| ३२.६ | ३२.५ | ३३.० | ३४.० | ३२.२ | ३२.४ | ३३.० | कमाल तापमान (अं.से) | ३४ | ३३ | ३३ | ३३ | ३३ |
| ९.० | १०.० | १०.० | ११.० | ११.० | ११.० | १०.५ | किमान तापमान (अं.से) | १७ | १६ | १६ | १७ | १७ |
| ३ | ० | ० | ० | ० | ० | ० | मेघाच्छादन (ऑक्टा) | ० | ० | ० | ० | १ |
| ८८ | ९२ | ९५ | ९० | ९० | ९० | ९५ | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ४९ | ४८ | ४५ | ५१ | ५२ |
| ६५ | ६० | ५८ | ६० | ५९ | ६० | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता | ३४ | ३५ | ३५ | ३४ | ३४ |
| ०.२ | - | - | - | - | - | - | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ६ | ८ | ६ | ६ | ६ |
| शांत | शांत | शांत | शांत | शांत | शांत | शांत | वाऱ्याची दिशा | ई. पू. | ई. पू. | पू. | ई. पू. | ई. पू. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०१८ पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| ०.० | ०.० | ३०७१.८ |

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला

**दिनांक ९ ते १३ जानेवारी २०१९ पर्यंत कमाल व किमान तापमानात साधारण राहील तसेच आद्रता कमी होण्याची शक्यता आहे.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| भात | रोप अवस्था | • उन्हाळी भात रोपवाटीकेस नियमित पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| वाल | फुलोरा अवस्था | • कमी होणारी आद्रता तसेच पिक फुलोऱ्यात येण्याची व दाणे भरण्याची अवस्था ओलाव्यासाठी अति सवेंदनशील असल्याने वाल पिकास फुलोऱ्याच्या काळात व शेंगा भरताना पाणी व्यवस्थापन करावे. |
| भुईमुग | वाढीची अवस्था | • भुईमुग पिकास पाणी व्यवस्थापन करावे. |
| आंबा | मोहोर अवस्था | • आंबा पिकामध्ये मोहोर संरक्षण वेळापत्रकानुसार तिसरी फवारणी मोहोर फुलण्यापुर्वी इमिडाक्लोप्रीड १७.८ टक्के प्रवाही ३ मि. ली. ६ मि. ली. प्रति १० पाण्यात मिसळून फवारणी करावी. त्यामुळे तुडतुडे तसेच मिजमाशीचे नियंत्रण होवू शकेल व त्याचा परपरागीकरण करणाऱ्या कीटकावर होणारा परिणाम टाळता येईल. तसेच फवारणीच्या वेळेस किटकनाशकाच्या द्रावणामध्ये भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी ५ टक्के हेक्झाकोनॅझोल ५ मि. ली. किंवा पाण्यात विरघळणारे ८० टक्के गंधक २० ग्रॅम प्रति १० लिटर या प्रमाणात वापरावे. |
| भाजीपाला/ फळबाग रोपवाटिका | फलधारणा | • टोमॅटो, वांगी, पिकावर शेंडा व फळे पोखरणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास किडग्रस्त फांद्या व फळे जमा करून नष्ट करावीत व फेनव्हलरेट १० मिली १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**